पुढारी

# लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन

**लोणावळा :** लोणावळा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल (लिफ्फी) या चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन प्रसिद्ध अभिनेते व चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अभिनेते मुकेश खन्ना यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. १ ते ३ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या चित्रपट महोत्सवात ३२ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

लोणावळ्यातील ट्रायोज मॉल यथे पार पडत असलेल्या या फेस्टिव्हलच्या सुरुवातीला संवाद आणि संपर्क या सामाजिक संस्थांच्या मुलांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी मुकेश खन्ना यांच्या सोबत अल्ट्रा मीडिया ॲण्ड एंटरटेनमेंट प्रा.लि.चे सीईओ सुशीलकुमार अग्रवाल, अभिनेते राजेश पेडणेकर, निर्माता जितेंद्र मिश्रा, अभिनेते कवलजीत सिंग, अभिनेते, लेखक निर्माते विवेक वासवानी आणि आयोजक माधव तोडी उपस्थित होते.



**लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना अभिनेते मुकेश खन्ना.**

My Pimpri
Page No. 05 Sep 02, 2017
Powered by: erelego.com